दै. लोकसत्ता - 12 नोव्हेंबर, 2022

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

लोकसत्ता प्रतिनिधी

जळगाव - सध्या सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढले असल्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सजगता वाढावी यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. एमबीएच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबद्दल माहिती देण्यात आली. संगणकशास्त्र प्रशाळेचे विद्यार्थी स्वयंसेवक जय पंडित, भावेश थोरात यांनी माहिती दिली.

संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थी स्वयंसेवक धनराज बोंडे, मानसी बोरोले यांनी सायबर सुरक्षेबद्दल संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही सत्रांमध्ये त्यांनी २७० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दोन्ही कार्यक्रमांना संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. मनीष जोशी, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे, क्विक हिल फाउंडेशनतर्फे महेश भडी आदी उपस्थित होते.